नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/05/2023 (मंगळवार) सकाळ

---

## गांजा तस्करी करणारा आरोपी १३.३२२ किलो गांजासह गजाआड
## —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिण ची कारवाई :—

दिनांक ०८/०५/२०२३ रोजी पोलीस स्टेशन एम. आय. डी. सी. बुट्टीबोरी परीसरात स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलींग करीत असतांना स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामिणचे पथकास गोपनिय माहीती प्राप्त झाली की, मौजा MIDC पार्किंग येथील सार्वजनिक शौचालय जवळ दर्शन नावाचा इसम अवैधरीत्या अंमली पदार्थ गांजा बाळगुन विक्री करीत आहे. अशा मिळालेल्या माहीती वरून सदरचे पथकाने पोलीस ठाणे एम.आय.डी.सी बटुटीबोरी परिसरात मौजा MIDC पार्किंग येथील सार्वजनिक शौचालय जवळ सापळा रचुन **आरोपी नामे— दर्शन रत्नाकर पारेकर, वय ३० वर्ष, रा. वार्ड क्र. ४, टाकळघाट, त. हिंगणा जि. नागपुर** हा एका पांढऱ्या रंगाच्या बोरीमध्ये गुंगीकारक वनस्पती गांजा बाळगताना मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन एकुण १३.३२२ कि.ग्रॅ. अंमली पदार्थ गांजा किंमती अंदाजे १,३२,५४०/—रू., नगदी ७००/—रू. असा एकुण १,३३,२४०/—रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपींला जप्त मुद्देमालासह पोलीस ठाणे एम.आय.डी.सी बुटीबोरी यांचे ताब्यात देवुन आरोपीं विरूध्द पोलीस ठाणे एम.आय. डी.सी. बुटीबोरी येथे NDPS Act अन्वये गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही नागपुर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात परि. सहायक पोलीस अधीक्षक श्री. अनिल मस्के, परि. पोलीस उपअधीक्षक श्री. राहुल झालटे स्थानिक गून्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहा. पोलीस निरिक्षक राजीव कर्मलवार, अनिल राऊत, पोलीस उपनिरीक्षक आशिष मोरखेडे, पोलीस हवालदार मिलींद नांदुरकर, निलेश बर्वे, दिनेश आधापुरे, मयूर ढेकले, इकबाल शेख, महेश जाधव, पोलीस नायक सत्यशील कोठारे, अमृत किनगे, रोहन डाखोरे, चालक सुमित बांगडे यांनी पार पाडली.




## गौणखनिज रेतीची चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

पो.स्टे. देवलापार :— अंतर्गत मौजा चिचदा शिवार चिचदा ते नवेगाव येथे दिनांक ०८/०५/२०२३ चे ११/०० वा. ते ११/४० वा. दरम्यान पोलीस स्टेशन देवलापार येथील स्टाफ यांना गुप्त बातमीदारांकडुन माहीती मिळाली की, मौजा चिचदा शिवार चिचदा ते नवेगाव येथे अवैधरित्या ट्रॅक्टर ट्रॉलीच्या साहाय्याने गौणखनिज रेतीची चोरी होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त बातमीवरून पोलीस स्टेशन देवलापार येथील स्टाफने घटनास्थळी जावुन लाल रंगाचा महींद्रा कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम एच ३६/ एल.—४६६० व लाल रंगाची विना क्रमांकांची ट्रॉली मध्ये **आरोपी नामे —मोहन पतीराम लांजेवार वय ४८ वर्ष रा. शिवाजी वार्ड, रामटेक** हा शासनाचा कर चूकवून विना परवाना गौण खनिज रेतीची नाल्यातून चोरटी वाहतूक करतांनी पंचासमक्ष मिळून आल्याने त्याचे ताब्यातून एक लाल रंगाचा महीन्द्रा कंपनीचा ट्रॅक्टर क्र. एम एच.— ३६ एल— ४६६० व लाल रंगाची विना क्रमांकाची ट्रॉली किंमती अंदाजे ४,५०,०००/रू. व अंदाजे १ ब्रास रेती किंमती अंदाजे ५,०००/—रू. असा एकुण वाहनासह ४,५५,०००/—रूपयाचा मुददेमाल आरोपीच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी देवलापार पोलीसांनी, पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरूद्ध कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. मेश्राम मों. क्र. ९०६७१७६६९४ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर